# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १६.०८.२०२२

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१५/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन वसमत शहर ०१,बासंबा ०१ असे एकुण येथे ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ८.३७ लिटर दारू असा एकुण ४,१००/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**फसवणुक :—**दिनांक १५/०८/२०२२ रोजी फिर्यादी संजय बाबुराव फड व्य.नौकरी शिक्षक तोष्णीवाल कॉलेज सेनगाव रा.पवार पब्लीक स्कुलच्या समोर अंबीका नगर हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ४२० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१४.०८.२२ रोजी चे १७:३० ते १८:३० वा चे दरम्याण पवार पब्लीक स्कुलच्या समोर अंबीका नगर हिंगोली येथील घरी आरोपीने फिर्यादीस फोन करून तुमचे एस.बी.आय.क्रेडीट कार्डचे बिल पेडींग आहे ते भर अन्यथा तुम्हाला दंड लागेल असे म्हणुन फिर्यादीचे एस.बी.आय.क्रेडीट कार्ड इलाईट ४३३५८७८६४४३९६८५२ मधुन ९२,११५ रू स्वत:चे पे.टीएम वालेटवर ट्रान्सफर करून घेवुन फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.